CIDCO
WE MAKE CITIES

सकाळ मुंबई, रविवार, २३ फेब्रुवारी २०२५

# विमानतळ रस्ता प्रगतिपथावर...




नवी मुंबई : कळंबोली-जेएनटीपी रोडवरून जाणाऱ्या पनवेल ते नवी मुंबई विमानतळ उड्डाणपुलाचे काम जोरात सुरू आहे. के. सी. सिंग

CIDCO
WE MAKE CITIES

लोकमत Hello Navi Mumbai
Page No. 4 Feb 24, 2025

# घणसोलीतील दोन बांधकामे जमीनदोस्त

## नोटीसकडे दुर्लक्ष; सिडकोने केली कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** घणसोली विभागातील दोन बेकायदा बांधकामावर सिडकोने कारवाई केली आहे. गोठीवली येथील सेक्टर ३० डी मधील सुमारे २०० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडावर बेकायदा बांधकाम सुरू करण्यात आले होते.

बांधकाम संदर्भात पांडुरंग म्हात्रे यांना सिडकोने नोटीसही बजावली होती. त्याला प्रतिसाद न दिल्याने या बांधकामांवर कारवाई करण्यात आली. त्याचप्रमाणे याच भागातील सेक्टर ३० ए मधील २७८ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंड क्रमांक १८वर सुरू असलेले बेकायदा बांधकामही जमीनदोस्त करण्यात आले.

**२००**
चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडावर बांधकाम



### 'विनापरवाना कोणीही बांधकाम करू नका'

बेकायदा बांधकाम केल्याप्रकरणी बांधकामधारक समीर पाटील याला नोटीस बजाविण्यात आली होती. दरम्यान, येत्या काळात अनधिकृत बांधकामांच्या विरोधात मोहीम अधिक तीव्र केली जाणार असून, विनापरवाना कोणीही बांधकाम करू नयेत, असे आवाहन सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने केले आहे.